उस्माननगर पोलिस पालकांच्या भूमिकेत

# संसार जुळविला; ठाण्यातूनच केली सासरी पाठवणी

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर पत्नी रागाने माहेरी निघून गेली. तब्बल दोन वर्षे पती-पत्नीने एकमेकांचे तोंडही पाहिले नाही. त्यात पत्नीने पती अन् सासरच्या मंडळींच्या विरोधात हुंड्यासाठी छळ केल्याचा गुन्हाही दाखल केला. ही बाब उस्माननगरचे सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत पवार यांना समजल्यानंतर त्यांनी पती-पत्नी आणि दोन्ही कुटुंबीयांना ठाण्यात बोलाविले. त्यांच्यात खटके उडालेल्या कारणांची माहिती घेत दोघांचेही समुपदेशन केले. त्यानंतर पालकत्व स्वीकारत पती-पत्नीला हार घालून ठाण्यातूनच तिची सासरी पाठवणी केली. त्यामुळे तुटलेला संसार जुळाला.

सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत पवार यांनी नुकतेच उस्माननगर पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. आल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी हद्दीतील गावात असलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी घेऊन गावातील समस्या जाणून घेतल्या. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींची माहिती घेतली. त्याचवेळी त्यांना दोन वर्षांपूर्वी किरकोळ कारणावरून तुटलेल्या एका संसाराची माहिती मिळाली. कृष्णूर येथील सासरवाडी असलेली महिला आता माहेरीच राहत होती.

महिलेने पतीविरोधात केलेल्या तक्रारीवरून गुन्हाही दाखल झाला होता. सपोनि. चंद्रकांत पवार यांनी दोन्ही कुटुंबीयांना ठाण्यात बोलाविले. त्यांची समजूतही घातली. पोलिसांच्या पुढाकारामुळे तुटलेला संसार जुळाल्याने दोन्ही कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.



उस्माननगर पोलिस ठाण्याचे सपोनि. चंद्रकांत पवार यांनी पती-पत्नी आणि कुटुंबीयांची समजूत घातल्यानंतर पती-पत्नीने एकमेकांना हार घातले. त्यानंतर ठाण्यातूनच मुलीची सासरी पाठवणी करण्यात आली.

## पोलिस अन् नातेवाईकांच्या साक्षीने पुन्हा घातले हार

- पती अन् पत्नीचे नेमक्या कोणत्या कारणावरून खटके उडाले होते, याची माहिती घेतली. तसेच कुटुंबीयांचेही समुपदेशन केल्यानंतर पती-पत्नी दोघांनीही पुन्हा संसार करण्याचा मनोदय व्यक्त केला.
- त्यानंतर पती-पत्नीने पोलिसांच्या साक्षीने एकमेकांच्या गळ्यात हार घालून जीवनाची नव्याने सुरुवात करणार असल्याचे सांगितले. सपोनि. पवार यांनी पालकाची भूमिका घेत महिलेची ठाण्यातून थेट सासरी पाठवणी केली.